० प्रकरण तिसरे ०

१९५२ ची सार्वत्रिक निवडणूक

प्रकरण तिसरे

1952 ची सार्वत्रिक निवडणूक

शेतकारी कामगार पक्षाचे स्थान महाराष्ट्रात वाढवायचे असेल तर सभा, संम्मेलने अथवा अधिवेशने भरवून भागणार नाही तर त्यासाठी सत्ता मिळवावी लागणार आहे आणि त्यासाठी 1952 साली येणारी निवडणुकीची संधी आपण सोडायची नाही. कोणत्याही परिस्थितीत पक्षाची पहिली निवडणूक लढवायचीच व त्यासाठी सर्व कार्यकर्ते कामाला लागले. निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू झाली. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्री. तुळशीदास जाधव 2,3,4 सप्टेंबर, 1951 मध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांचा एक मेळावा घेतला. या शिबिरात जिल्हयातील अनेक राजकीय पुढारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. या शिबिरामध्ये आगामी निवडणुकीच्या संभाव्य उमेदवारांची निवड करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. निवडणुकीच्या रणधुमाळीत पक्षाच्या तत्वज्ञानाचा मतप्रणालीचा प्रचार होऊन पक्ष मजबूत संघटीत आणि विकसित करण्याची आलेली ही सुवर्णसंधी. त्या संधीचा पुरेपुर फायदा घेण्याचे शेतकारी कामगार पक्षाने ठरवले. असेंब्लिच्या आणि लोकसभेच्या जागेसाठी जास्तीत जास्त उमेदवार उभे करायचे असेही नेत्यानी ठरवले. कॉंग्रेस उमेदवाराचा पराभव करून विजय मिळवणा–या अचुक उमेदवाराची निवड करण्याची जबाबदारी तुळशीदासजीवर येऊन पडली.[1]

ठरल्याप्रमाणे दि. 13 व 14 आक्टोबर, 1951 रोजी सोलापूर जिल्हयातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक आमदार श्री. तुळशीदास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली "करमाळा"

येथे भरली. या बैठकीमध्ये बरेच कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीमध्ये कोणत्या भागात कोणता उमेदवार उभा करावयाचा या विषयी प्राथमिक चर्चा झाली. निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार उभे करून कॉंग्रेसशी प्रभावीपणे टक्कर देणे जरूर होते. निवडणुकीच्या रणधुरळीतच पक्षाच्या तत्वज्ञानाचा, मतप्रणालीचा प्रचार होऊन पक्ष मजबूत संघटित आणि विकसित करण्याची सुवर्ण संधी असा विचार करून असेंब्लीच्या जास्तीत जास्त जागेवर आपले उमेदवार उभे केले पाहिजे आणि लोकसभेच्याही जागा लढवल्या पाहिजेत असे पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी ठरवले.[2]

भारतीय गणराज्याच्या नव्या राज्यघटनेनुसार देशभर लोकसभा व राज्यसभा यांच्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. ऑगस्ट 1951 मध्ये बंगलोरला अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनात भारतातील पहिल्या सार्वजनिक निवडणुकीसाठी जाहीरनाम्याची तत्वे ठरवण्यात आली. 1952 च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस प्रचंड संख्येने निवडून येणार यात शंका नव्हती. तथापि, महाराष्ट्राच्या शहरी विभागात समाजवादी पक्षाने व ग्रामीण विभागात शेतकरी कामगार पक्षाने मोर्चे बांधणी केली होती. श्री. केशवराव जेधे, श्री. तुळशीदास जाधव, श्री. शंकरराव मोरे यांच्यासारखे धुरंधर नेते शेतकरी कामगार पक्षाला लाभले होते. श्री. तुळशीदास जाधव हे फार जुने व निष्ठावान कार्यकर्ते परंतु राजकीय मतभेदामुळे त्यानी कॉंग्रेस सोडली व शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली व होऊ घातलेल्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन निवडणुकीची व्युहरचना ठरवण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली.[3]

डॉ. आंबेडकरांचे सहकार्य –

महाराष्ट्रामध्ये "शेतकरी कामगार पक्ष हा स्वतःच्या स्वबळावर निवडणूक लढवू शकत नव्हता. तेव्हा त्यांना इतर लहान, लहान पक्षाच्या सहकार्याची गरज होती. तेव्हा श्री. तुळशीदास जाधव यांना इतर गटाशी समझोता करण्याची गरज वाटली व त्यांनी डॉ. आंबेडकराशी सहकार्यासाठी वाटाघाटी केल्या. सोलापूर जिल्हयात शेडयुल कास्ट फेडरेशनचे मतदार आणि कार्यकर्ते पुष्कळ होते. शेतकरी कामगार पक्षाला त्यांच्या सहकार्याने यश मिळवणे अवघड होणार नव्हते. तेव्हा शेडयूल कास्ट फेडरेशनचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी वाटाघाटी करणे आवश्यक होते. तेव्हा तुळशीदासांनी डॉ. आंबेडकरांची भेट घेऊन सोलापूर जिल्हयाची एकंदरीत परिस्थिती निवेदन करून शेतकारी कामगार पक्ष आणि शेतकारी कामगार फेडरेशनची युती होणे असे आवश्यक आहे हे त्यांना पटवून दिले. तेव्हा आंबेडकरांना प्रथम युती करण्यास अनुकुलता दर्शवली नाही. परंतु श्री. तुळशीदासांनी कॉंग्रेसचा पराभव करण्यासाठी दोघांची युती होणे कसे आवश्यक आहे हे पटवून सांगितले. तेव्हा आंबेडकरानी तुळशीदासांना एका शर्तीवर युती करण्यास अनुकुलता दर्शवली. ते आंबेडकर तुमच्या पक्षाशी युती करताना एका शर्तीवर करावयास तयार आहेत. असेंब्ली व लोकसभेच्या राखीव जागावर जी शेतकारी कामगार फेडरेशनचे लोक उभे आहेत त्यांना व श्री. पा.ना. राजभोज यांना निवडून आणण्याची जबाबदारी तुम्ही घेत असाल तर आम्ही तुमच्याबरोबर युती करण्यास तयार आहे. श्री. तुळशीदासांनी डॉ. आंबेडकरांची शर्त मान्य करून युती करण्याचे ठरवले व युती केली.[4]

तुळशीदासजींनी आपल्या कर्तृत्वाने सोलापूर जिल्हयावर पकड निर्माण केली होती. तुळशीदासजीवर पुण्या–मुंबईच्या कॉंग्रेस श्रेष्ठीचा इतका रोष होता की तुळशीदासजींना निष्प्रभ करावे. अपयशाने त्यांचे जीवन कलंकीत करावे व सार्वजनिक जीवनापासून त्यांना वंचित करावे म्हणून कॉंग्रेस कमिटीने तुळशीदासांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. कॉंग्रेस श्रेष्ठीने आपली प्रतिष्ठा पणाला लावून तुळशीदासजींना पराभव करण्याचा विडाच उचलला होता. कॉंग्रेसने प्रथम धन्यकुमार भुमकर या वैरागच्या प्रतिष्ठित नेत्यांना उमेदवारी दिली होती. परंतु भुमकर यांची उमेदवारी रद्द करून त्याजागी अनेक वर्षे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपद भूषविलेले, सोलापूर जिल्हा को–ऑपरेटीव्ह बॅकेचे डायरेक्टर असलेले व बहुजन समाजात प्रतिष्ठा असलेले माढयाचे प्रभावी कार्यकर्ते श्री. गणपतराव साठे यांना तुळशीदासजींच्या विरूध्द उभे केले. निवडणुक म्हटले की प्रचार आलाच व निवडणुकीमध्ये यशस्वी होण्याचे साधन म्हणजे "जनता" तुळशीदासजींनी सभा, संम्मेलने घेऊन लोकांना आपले विचार प्रकट करून दाखवले. तुळशीदासजीनी सर्व जनतेबरोबर राहून उठाव करून दुष्काळामध्ये त्यांना अन्न मिळवले होते व तो प्रकार जनता विसरली नव्हती. आपल्या अडचणी तुळशीदासच सोडवू शकतील असा आत्मविश्वास ग्रामीन जनतेमध्ये होता व त्या आधारेच झालेल्या निवडणुकीमध्ये श्री. तुळशीदास जाधव यांना 26171 मते मिळाली व त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. गणपतराव साठे यांना 15071 मते मिळाली. अशा प्रकारे असेंबलीच्या सात जागा आणि लोकसभेच्या श्री. शंकरराव मोरे आणि श्री. राजभोज या दोन्हीही जागा शेतकारी कामगार पक्षाने जिंकल्या व अशा प्रकारे तुळशीदासजींनी आपल्या नेतृत्वाची पकड महाराष्ट्रातील नेत्यांना दाखवली व त्यांनी केलेल्या कार्याची पावती सोलापूर जिल्हयातील लोकांनी मतदानाच्या रूपाने दिली. [5]

निवडणूक झाल्यानंतर शेतकारी कामगार पक्षाने मुंबई असेंबलीतील आपल्या पक्षाची व पक्षाने पुरस्कृत केलेल्या आमदारांची बैठक दि. 2 मे, 1952 रोजी सायंकाळी श्री. भाऊसाहेब राऊत यांचे बंगल्यावर घेण्यात येऊन "पक्षाचा नेता" म्हणून श्री. तुळशीदास जाधव यांची निवड करण्यात आली व पक्ष प्रतोद म्हणून श्री. खांडेकर आणि विधीमंडळ पक्ष सेक्रेटरी म्हणून श्री. बी.डी. बराले यांची निवड केली.

मुंबई विधी मंडळामध्ये विरोधी पक्षाचे म्हणजेच शेतकरी कामगार पक्ष व त्यांचे पुरस्कृत सदस्य हे बहुसंख्य असल्यामुळे विधीमंडळाच्या सभापतीनी श्री. तुळशीदास जाधव यांना विधीमंडळ पक्षाचा नेता म्हणून मान्यता दिली.

तुळशीदास जाधव हे 1937 ते 1957 असे वीस वर्षे मुंबई विधिमंडळ पक्षाचे सदस्य होते. 1952 पासून ते 1955 पर्यंत ते विधीमंडळामध्ये विरोधी पक्षनेते म्हणून होते. या कारकिर्दीत त्यांनी असेंब्लीमध्ये अनेक प्रश्न विचारून सरकारला अडचणीत आणले होते.[6]

तुळशीदास जाधव यांनी विधीमंडळामध्ये असताना असेंबलीमध्ये मांडलेली कांही मुद्दे, प्रकरणे व भाषणे .....

एरंडगांव (जिल्हा – अहमदनगर) गोळीबार प्रकरण –

अहमदनगर जिल्हयातील एरंडगांव या गावामध्ये दि. 24/3/1949 रोजी पहाटे 4 वाजता तेथील गोडावूनमधून धान्याची पोती नेण्यासाठी 20 पोलीस 15 होमगार्डस्, मामलेदार, एस्.डी.ओ. ऑफीसर्स व प्रांतसाहेब येथे मोटारी घेऊन आले होते. या अगोदर दि. 22–23 तारखेस वरील सर्व

अधिकारी आले होते. परंतु गावातील लोकांनी मामलेदारसाहेबांची भेट घेऊन आम्हाला फेअरप्राईस शॉप द्या व मग हे धान्य घेऊन जावा अशी विनंती केली. मामलेदारांनी लोकांची अडचण लक्षात घेऊन दुकान देण्याचे आश्वासन दिले. परंतु लोकांना विश्वास नसल्याने "प्रथम दुकान उघडा व नंतर धान्य न्या" असे सांगितले. परंतु अधिका–यांनी दि. 24 मार्च रोजी पोलीस पार्टी आणून तेथील माल हलवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गावातील 400–500 लोक एकत्र येऊन आमची मागणी मान्य झाल्याशिवाय आम्ही माल नेऊ देणार नाही असे सांगितले. ही सर्व गावातील मंडळी स्त्री–पुरूष व लहान मुलासहीत गोदामाजवळ बसली. परंतु सरकारच्या प्रेस नोटस्मध्ये ही मंडळी हिंसात्मक वृत्तीने जमा झाली होती असे म्हटले आहे. याबाबतीत श्री. तुळशीदास जाधव यांना सभागृहाला सांगायचे होते की, मामलेदार साहेबांनी चौकशी केली तेव्हा त्यांनी प्रथम दुकान उघडा व नंतर धान्य न्या' अशी मागणी केली होती. ते हिंसात्मक वृत्तीने तेथे आले नव्हते परंतु सरकारने प्रेस नोट काढून ते हिंसात्मक प्रवृत्तीने आले होते तेव्हा मला सभागृहाला एवढे सांगायचे आहे की, सरकारने काढलेली प्रेस नोट्स चुकीची आहे. त्या ठिकाणी जे लोक जमले होते त्यांचे म्हणणे असे की, "आमच्या मुलाबाळाना उपाशी ठेवून हे धान्य तुम्ही नेऊ नका आणि तुम्हाला ते घेऊन जायचे असेल तर आम्हाला फेअरप्राईस शॉप काढून द्या व मगच ते धान्य घेऊन जा. तेथील लोकांनी आपली मागणी मान्य झाल्याशिवाय तेथून जाण्याचे नाकारले. म्हणून प्रांतसाहेबांनी 144 कलम जाहीर केले. तरीही लोक तेथे राहिले तेव्हा सरकारी अधिका–यांनी पोलीसांना लाठीमार करण्याचा हुकुम दिला व होमगार्डच्या कमांडरचे गोळीबार करण्यास सुरूवात केली. या गोळी–बारात 7–8 लोक मारले गेले व अनेक जखमी झाले. तेव्हा अध्यक्ष महादेय मी आपणास असे विचारू इच्छितो की, गोळीबार करण्यासाठी प्रथम काय नियम आहेत ते आपण वापरला आहे

काय ? या गोळीबारामध्ये निरपराध माणसांवर अमानुष गोळीबार करणे हे स्वकीय सरकारला शोभणारे नाही.

सध्या सरकारने जो आरोप केला आहे की, तेथे जमलेले लोक हिंसात्मक वृत्तीने जमा झाले होते. या बाबतीत मला असे सांगायचे आहे की, त्या लोकाजवळ कु–हाडी, भाले, काठया या प्रकारची कोणतीही साधने नसून आम्ही उपाशी आहोत हे दाखवण्यासाठी तेथे जमले होते.

तेव्हा मी आपणास सांगू इच्छितो की, सध्या जो राज्य कारभार चाललेला आहे तो होमगार्डस् व गावातील कांही कॉंग्रेसच्या लोकांच्या तंत्राने चाललेला आहे. त्या गावामध्ये आपसात जी भांडणे होती त्याचा सूड घेण्याच्या उद्देशाने हा गोळीबार झालेला आहे.[7]

धांगवडी (जिल्हा–पुणे) दरोडा प्रकरण –

पुणे जिल्हयातील धांगवडी गावी दि. 2 जून, 1949 रोजी एका सावकाराच्या घरावर दरोडा पडला होता. त्या दरोडयाच्या तपासामध्ये पोलीस अधिकारी व पोलीस यांनी स्त्री व पुरूषांना संशयीत आरोपी म्हणून अटक करून त्यांच्यावर पाशवी जुलुम केला व त्यामध्ये एक स्त्री मरण पावली. तेव्हा या प्रकरणाबद्दल श्री. तुळशीदास जाधव यांनी पुण्यात असेंब्लीचे पावसाळी अधिवेशन चालू होते. आ. तुळशीदास जाधव यांनी दि. 15 सप्टेंबर, 1949 रोजी असेंबलीत तातडीचे प्रश्न उपस्थित करून मा. सभापतींना धांगवडी येथे घडलेल्या प्रकारची चौकशी करण्याची मागणी केली.[8]

राजापूर गोळीबार प्रकरण –

नगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यातील राजापूर येथे दि. 9 मार्च, 1950 रोजी गोळीबार झाला होता. याचे कारण असे की, राजापूर येथे जिल्हा किसान सभेची सभा भरणार असल्याने दि. 8 मार्च, 1950 रोजी भरणार होती. जिल्हा किसान सभेत कम्युनिष्ट विचारसरणीच्या कार्यकर्त्यांचा अधिक भरणा असल्याने ही बैठकच होऊ द्यायची नाही असा सरकारचा हेतु होता आणि एवढयासाठीच सरकारने पोलीस सरंजाम आणून गावावर आपला दरारा बसवला. कारण या दहशतीमुळे सभेला कोणतीही व्यक्ती हजर राहू नये असा सरकारचा उद्देश होता.

एवढेच नव्हे तर सर्व गावाला वेडा देऊन गावामध्ये कोणाही व्यक्तीला येऊ दिले नाही. अथवा बाहेरही जाऊ दिले नाही. तेव्हा शेतात सुगीचे दिवस असल्याने लोक शेतात होते. त्यांनाही गावात येण्यास मनाई केली व लोकांनी हालचाल केली तर गोळीबार करण्याची धमकी दिली.

राजापूर हे विडी कामगाकरांचे गाव आहे व तेथे विडी कामगारांचा कम्युनिष्टांकडे जास्त ओढा होता. कम्युनिस्ट कार्यकर्ते भुमिगत होते. पण पोलीस छळत आहेत हे पाहिल्यानंतर त्यांनी सरकारी धान्य गुदामे लुटण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तेथे आलेल्या जमावावर पोलीसांनी गोळीबार केला. त्यामध्ये चार लोक मारले गेले व पंधराजण जखमी झाले. तेंव्हा या घडलेल्या प्रकाराबद्दल श्री. तुहशीदास जाधव यांनी राजापूर येथे जाऊन सदर प्रकाराची चौकशी केली. तेव्हा त्यांना असे समजले की, हया गोळीबाराचा आदेश लेखी नव्हता. तुळशीदासांनी मेलेल्या लोकांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. तुळशीदासांनी या प्रकाराची सर्व माहिती गोळा केल्यांनतर असे समजले की, प्रांत साहेबांनी संबंध संगमेश्वर तालुक्यावरच 144 कलम लागू केले होते. सरकारला

या प्रकाराबाबत विचारले असता त्यांनी असे सांगितले की, "कांही भुमीगतांना पकडून नेत असता कम्युनिष्ट जमावाने पोलीसांवर दगडफेक केली. त्यामुळे पोलीसांना नाईलाजास्तव गोळीबार करावा लागला.

वरील घटना वरून आपणास लक्षात येते की, श्री. तुळशीदास जाधव हे सर्व सामान्य जनतेवर झालेल्या अन्यायाविरूध्द कशा प्रकारे लढा देऊन जनतेचे प्रश्न व त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची जाणीव सरकारला करून देऊन ते निवारण करण्याचा प्रयत्न जाधव यांनी केला आहे.[9]

जुन्या गिरणीचा प्रश्न –

दि. 13 सप्टेंबर, 1949 रोजी आमदार तुळशीदास जाधव यांनी जुन्या गिरणीचा प्रश्न प्रस्थापित केला. तेव्हा ते आपला मुद्दा स्पष्ट करताना म्हणाले, "मुंबई प्रांतामध्ये 214 कापड व सूत गिरण्या आहेत. त्यामध्ये पावने तीन लाख कामगार आहेत. त्यापैकी वीस गिरण्या पूर्णपणे बंद आहेत व चौदा गिरण्यातही रात्रपाळी बंद आहे व आणखीन बारा गिरण्या बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यासाठी कामगारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सोलापुरमध्ये गिरणीवाले वेळेवर पगार देत नाहीत. त्यामुळे कामगारांचे हाल होत आहेत. सोलापुरमध्ये सभाबंदी असल्यामुळे कामगारांना आपली गा–हाणी मांडता येत नाहीत. अहमदाबादेतील बंद झालेल्या गिरणीतील कामगारांची दुसरीकडे सोय करण्यात आली आहे. तसे सोलापुरात घडत नाही. जुन्या गिरणीच्या चालकांनी मॅनेजिंग एजंट म्हणून लाखो रूपये कमावले. गिरणीच्या कारभारातही त्यांनी अंदाधुंदी गाजवली पण सरकार त्यांच्यावर खटले भरत नाही. सरकारने बेकार झालेल्या लोकांना दुसरा उद्योगतरी द्यावा अगर बेकार भत्ता तरी द्यावा. आज तेथे पस्तीस हजार लोक बेकार होते व

पाऊन लाख लोकांना भुकेने तडफडण्याची वेळ आली आहे. तेव्हा अशा परिस्थितीतून मार्ग काढून त्यांच्यावर आलेल्या आपत्तीचा सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करावा. [10]

सुरक्षा कायदा –

मुंबई विधीमंडळामध्ये मांडल्या गेलेल्या सुरक्षा कायदा बिलाला दि. 23 फेब्रुवारी, 1950 रोजी श्री. तुळशीदास जाधव यांनी कडाडून विरोध केला. ते आपल्या भाषणात म्हणाले, जो या सभागृहामध्ये मांडलेले पब्लिक सिक्युरिटी मेसर्स ॲक्ट मांडलेला आहे त्यांच्यावर अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, ज्या हेतुने आपण स्वराज्य मिळवले त्यांना या स्वराज्याचा फायदा मिळू नये व त्यांनी कोणत्याही प्रकारचे कष्ट सहन केले नाही. अशा ठराविक लोकांना या स्वराज्याचा फायदा मिळाला. त्यांना आवश्यक असलेल्या गोष्टी त्यांनी योग्य वाटणा–या अशा मार्गानी साध्य करून घेण्याचा प्रयत्न केला. तर त्यांना बंदुकीच्या बहुमताच्या आणि सभागृहापुढे असलेल्या कायद्याच्या जोरावर दडपून टाकायचे असे या बिलाचे ध्येय आहे.

या बिलावर खोलवर विचार केला तर या प्रांतातील कोणत्या वर्गाच्या शांततेसाठी अथवा संरक्षणासाठी हे बील आणले आहे हे समजणे कठीण आहे. प्रांतातील लोकसंख्येपैकी शेकडा 95 लोक रात्रंदिवस उपासमारीत व अशांततेत खिचपत पडलेले आहेत. त्यांनी आपले म्हणणे सामुदायिकरित्या किंवा वैयक्तिकरिकत्या जनतेपुढे मांडणे, त्यासाठी सभा घेणे, कांही गोष्टी सत्तेवर असलेले लोक ऐकत नसले तर त्या विरूध्द योग्य मार्गाने चळवळ करकणे हया गोष्टी

गुन्हा म्हणून ठरवण्यासाठी एक हत्यार सरकार जवळ असावे म्हणून हे बील सभागृहात पास करून घेतले आहे.

या बिलाचा उद्देश हा कि, देशाला नुकतेच स्वातंत्र मिळाले आहे. जातीय दंगे चालू आहेत व इतर ही कांही भानगडी होण्याची शक्यता आहे. तेव्हा दंगा करणा–या अथवा दहशत निर्माण करणा–या लोकांना तुरूंगामध्ये ठेवण्याचे आदेश दिले व सरकारने अशा प्रकारचा कायदा केला. परंतु परिस्थिती नियंत्रणाखाली आल्यानंतर त्यांना सोडून द्यावे अशीही या कायद्यात तरतूद होती. परंतु अद्यापही कांही लोकांना सरकारने सोडले नाही. ज्यावेळेस हे बील पास केले तेव्हा त्यास जनतेची मान्यता आहे का नाही हे पहाणे जरूरीचे होते. जे लोक सत्ताधारी पार्टीत आहेत त्यांनी या बिलास विरोध केलेला नाही. असे सांगितले अशा प्रकारे तुळशीदास जाधव यांनी सुरक्षा बिलाबाबत सरकारला धारेवर धरले. [11]

अंदाज पत्रकावर चर्चा –

मुंबई विधीमंडळामध्ये 1950–51 मध्ये अंदाजपत्रक मांडल्यानंतर शेतकारी कामगार पक्षाचे नेते आमदार श्री. तुळशीदास जाधव यांनी आपले मत मांडले. सध्या जे अर्थमंत्र्याने अंदाजपत्रक मांडले आहे. ते पाहिले असता जमेच्या व खर्चाच्या बाजूला मोठमोठे आकडे आहेत. यातून एक गोष्ट प्रामुख्याने दिसून आली ती म्हणजे हे अंदाजपत्रक सरकारने गरीबासाठी तयार करायला पाहिजे होते. तसे यात कांहीही केलेले नाही. यामध्ये ज्यांच्याजवळ पुष्कळ पैसा आहे त्यांना थोडा सुध्दा धक्का लावायला सरकार तयार नाही. आपल्या प्रांताचे बजेट तोंड मिळवण्याचे असल्याने सन्मानीत सदस्यांनी सरकारीच स्तुती केली आहे.

सत्ता ही जितकी विकेंद्रीत होईल त्या प्रमाणात त्या सत्तेचा फायदा बहुजन समाजाला होत असतो. पण तसा फायदा बहुजन समाजला मिळत नाही. हे सरकार जनतेची उन्नती करणार आहे अशी जी भावना आहे, मग ते प्रांतीक सरकार असो किंवा मध्यवर्ती सरकार असो. सेल्सटॅक्स हा विषय प्रांतीक सरकारचा असताना पुन्हा मध्यवर्ती सरकारने त्यात हात घालून हिस्सा घेणे बरोबर नाही. मध्यवर्ती सरकारच्या बजेटवर मी बोलत नाही. पण त्या बजेटचा परिणाम प्रांतीक सरकारच्या बजेटवर कसा होतो हे मी दाखवले आहे. बिझीनेस प्रॉफीटस्खाली आठ कोटी रूपयाची रक्कम दाखवण्यात आली आहे. एवढा पैसा सोडला याचा अर्थ असा की, श्रीमंत लोकावरचा बोजा कमी झाला. तो प्रत्यक्ष नव्हे तर अप्रत्यक्षरितीने गरीबावर बसणार हे उघड आहे. याला गरीबाचे बजेट कसे म्हणता येणार ? आपल्या राष्ट्रात जसजशा नवीन नवीन सुखसोई येतील तसतशी एकंदरीत नागरीकांची उन्नती होत जाईल. तेव्हा सरकार वागते कसे हे ठरवण्यासाठी त्यांचा प्लॅन पाहणे जरूरीचे आहे. या धोरणाचा परिणाम असा झाला की, श्रीमंत धनवा होत आहेत. व खालचा मध्यम वर्ग खालावत आहे. जो मध्यम वर्ग बुध्दीने काम करणारा आहे त्यांना नोकरीवरून कमी करावयाचे खेडयामध्ये जो दरीद्री समाज आहे त्यांना उपाशी मारायचे आणि वरच्या वर्गाना इन्कमटॅक्स देऊ नका असे सांगावयाचे आणि त्या सगळयावर शेतक–याला मात्र उत्पादनात वाढ करण्याविषयी सांगायचे.

सरकारने ज्या स्कीम गरीबांच्या उन्नतीसाठी आहेत त्या रद्द करण्याऐवजी किंवा मध्यम वर्गाला नोकरीतून कमी करण्याऐवजी औद्योगिक कर सरकारने बसवू शकले असते. एक कोट रूपये शेतकी खात्यावरील खर्चात कमी केले पण दुसरे आकडे पाहिले तर त्यात वाढ झालेली दिसून येते. डेप्युटेशन आलाऊन्स वाढला आहे, मिनीस्टर्स वाढले आहेत. त्यांचा स्टाफ वाढला

आहे. या गोष्टीवर खर्च वाढला आहे. पण प्रत्यक्ष शेतक–यांच्या पदरात कांही पडेल असे मात्र त्यामध्ये नाही. तेव्हा जर गरीबांच्या पदरात पाडायचे असेल तर वरील सांगितलेल्या योजनांची अंमलबजावणी होणे जरूरीचे आहे असे श्री. तुळशीदास जाधव यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले.[12]

मुंबई असेंब्लीमध्ये दि. 16 मार्च, 1950 पोलीस खात्याच्या कारभाराबाबत चर्चा चालू असताना श्री. तुळशीदास जाधव यांनी आपले मत व्यक्त केले. पोलीस खात्याबाबत मी जे माझे विचार व्यक्त केले ते माझ्या सहकारी सभासदांना आवडले नाहीत व तो मुद्दा त्यांना महत्वाचा वाटला नाही. म्हणून त्यांनी चर्चेत भाग घेतला नसता पण चर्चेमध्ये सर्व सदस्यांनी भाग घेण्याची गरज नव्हती. माझा मुद्दा असा होता की, लोक दडपण आणत असतील त्यांच्या कारभारात जर लोक ढवळाढवळ करत असतील तर ते माननीय मंत्रीमहोदयाच्या निदर्शनास आणून देणे हे मी माझे कर्तव्य समजतो. तेव्हा मी असा मुद्दा मांडला असता मला माझे अंतःकरण तपासून पहाण्यासाठी उपदेश करण्यात आले.

सन्माननीय सभासद श्री. धुम्मा यांनी आपल्या भाषणात सोलापूरला मिरवणूमीचा हुकूम दिला होता. पण डॉ. अं ोळीकर यांनी अधिका–यांकडे जाऊन तो बदलून घेतला असे सांगितले. हयावरून सभागृहाच्या लक्षात येईल की, सरकारी कारभारात कशी ढवळाढवह केली जाते तेव्हा कांही सभासदांनी माझी मते खोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कम्युनिष्टाबद्दल जे कांही सांगितले त्याबद्दल मला कांही बोलायचे नाही. पण ते जे जिवीत व वित्त हया बद्दल बोलले त्याबद्दल मला एवढेच सांगायचे आहे, शेकडा 99 लोकांच्या जिवीताची काळजी घ्या आणि राज्य

चालवताना दोन–चार लोकांच्या फायद्यासाठी कोणतीही गोष्ट करू नका. त्यांनी नगर जिल्हयाबद्दल उदाहरण सांगितले. पण सातारा जिल्हयात जे प्रकार होतात त्याबद्दल ते कांही बोलले नाहीत. तेथे अशा त–हेचे पोलीस दल ठेवले जात नाही. भांडवलदार समाजाला जगण्यासाठी बायामाणसाची आब्रु घेणे बरोबर नाही एवढेच मला सांगायचे आहे. त्यांनी जातीयतेचा प्रचार आमच्या आपल्या पक्षाकडून केला जातो असे सांगितले. त्याबद्दल मला सांगायचे आहे की, पोलीसांचा रिपोर्ट घेऊन एखादे उदाहरण त्यांनी काढून दाखवावे. उलट कॉंग्रेसमध्येच जातीयतेचा अत्यंत घाणेरडा आरोप त्यांच्यासारख्याकडून केला जातो असे मला त्यांना सांगायचे आहे.[13]

मुंबई विधीमंडळामध्ये 24 मार्च, 1950 रोजी डिस्ट्रीक्ट एक्झीक्युटीव्ह फोर्स या बाबतीत चर्चा चालू असताना तुहशीदास जाधव यांनी या बिलावर आपले मत मांडताना ते म्हणाले डिस्ट्रीक्ट एक्झिक्युटीव्ह फोर्सबाबत जी रक्कम खर्ची घातलेली आहे तिच्याकडे जर बारीक दृष्टीने पाहिले तर त्या खर्चामध्ये पोलीस खाते आणि त्यांचा खर्च सारखा वाढतो आहे असे आपणास दिसून येते. त्याचे कारण असे दिले आहे की, जे बेकायदेशीर दारूच्या केसेस पकडताना त्यांना बक्षीस दिले जाते त्याच प्रमाणे कांही पोलीस केसेस्साठी ही पोलीसांची वाढ व हालचाल जास्त होत आहे असे म्हटले आहे. एकीकडे स्टाफ कमी करावयाचा आहे असे गव्हर्मेंट म्हणते आणि दुसरीकडे हा स्टाफ वाढवते या दोन्ही गोष्टीत विसंगती दिसत आहे. त्याचप्रमाणे पोलीस खात्यावरील आकडे पाहिले तर असे दिसून येते की, या पोलीसांचा पगार 1440 आहे आणि त्यांचे ॲलौन्सेस ऑनरेरीआ आणि इतर खर्च जो आहे तो पाहिला तर 4.335 आहे. म्हणजे सरकारी नोकरांच्या पगारापेक्षा हा त्यांचा बाकीचा खर्चच अफाट वाढत आहे. ज्यामुळे सरकारला ही हालचाल करावी लागत आहे असे

प्रांतात काय झालेले आहे हे मला समजत नाही. नोकराला त्याच्या पगारापेक्षा त्याचे अलौन्सेस, त्यांच्या जीप मोटारी त्यांना लागणारा बाकीचा खर्च जास्त होत आहे. आणि इतके सगळे करूनही त्यांना पुन्हा बक्षीस द्यावयाचे. तेव्हा अशा प्रकारे सुखसोई देऊन खर्चात वाढ करणे योग्य नाही.

महाराष्ट्र कर्नाटक आणि गुजरात हया तीन ठिकाणी सेंटर्स काढण्यात येणार आहेत. गुजरात करता नवीन सेंटर्स काढायचे ठरवले आहे. हा प्रोव्हीन्शीअल रिझर्व्ह कॉन्स्टेब्युलरी फोर्स निर्माण करायचे. कारण काय आहे हे मला कळत नाही. एकीकडे लोकशाही पध्दतीने राज्य चालवायचे आहे. लोकामध्ये निर्भयता निर्माण करावयाची आहे असे सरकार सांगते आणि दुसरीकडे मात्र अशा प्रकारचा रिझर्व्ह फोर्स तयार करण्यात येत आहे. इंग्रजी राज्यात जसा मिलटरीचा उपयोग करण्यात येत आहे त्याच प्रमाणे हया फोर्सचा उपयोग होत आहे. पण बाहेरमात्र तसे दाखवले जात नाही. पुणे जिल्हयात पुरंदर हया ठिकाणी एक हजार बेळगाव जिल्हयातील सांब्रे या ठिकाणी एक हजार आणि गुजरातमध्ये जे सेंटर काढण्यात येणार आहे तेथे एक हजार असा फोर्स तयार आहे. मला असे सांगायचे आहे की, हल्ली असलेला पोलीस फोर्स हाच जास्त आहे. सध्या पोलीस खात्यावर जो आठ कोटी रूपये खर्च होत आहे त्यात आणखी भर घालण्याची काय जरूरी आहे ?

तेव्हा सरकारने उत्तर दिले की, हया फोर्समध्ये असलेल्या लोकांना जे शिक्षण द्यावयाचे असते ते कठीण आणि त्रासदायक असते. म्हणून हा खर्च करण्यात आला आहे. म्हणजे पोलीसाना फार मेहनत घ्यावी लागते. त्यांना फॅमिलीपासून अलग ठेवण्यात येते. आणि त्यांच्या फॅमिलीचा सर्व खर्च आणि त्यांचा स्वतःचा खर्च असा दुबार खर्च होतो. तेव्हा कॉंपेन्सेटरी अलौन्स म्हणून दहा

रूपये जास्त देण्याचे ठरवले आहे. तेव्हा मला सरकारला विचारायचे आहे की, हा जो कोर्स तयार करण्यात येणार आहे हया लोकांना मिलीटरीतील लोकासारखे अलग ठेवून पब्लिकचा व त्यांचा संबंध येऊ द्यावयाचा नाही असे करण्याचे कारण काय असा प्रश्न श्री. तुळशीदास जाधव यांनी सरकारला विचारला. [14]

स्थानिक अधिकाराबाबत –

मुंबई विधीमंडळाच्या पुण्यात भरलेल्या अधिवेशनात "स्थानिक अधिकार" या विषयावर 5 मार्च, 1950 रोजी श्री. तुळशीदास जाधव यांनी आपले विचार मांडले. "स्थानिक स्वराज्य संस्थेत जातीसाठी जागा राखीव ठेवलेल्या आहेत. महिलासाठी राखीव जागाचे प्रमाण वाढवले पाहिजे. कारण स्त्रीयांच्या अडचणी पुरूषांपेक्षा स्त्रीलाच जास्त कळतात."

चालू अधिवेशनामध्ये सरकारने जी स्त्रीयांबाबत घोषणा केलेली आहे ती अत्यंत जरूरीची आहे. स्त्रीयांना समाजात काय चालते आहे याची जाणीव होणे हे समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. आतापर्यंत समाजात स्त्रीयांचे क्षेत्र चूल आणि मूल याच्याबाहेर त्यांनी येता कामा नये अशी प्रवृत्ती होती. त्याप्रमाणे गाडीला दोन चाके असतात व त्यापैकी एक चाक मोडले तर गाडी चालू शकत नाही त्याप्रमाणे स्त्रीया जर मागे राहिल्या तर समाजाचा रथ मागे पडल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून स्त्रीयांना घराबाहेरील क्षेत्रात येऊ देणे, त्यांनी नगरपालिका, लोकलबोर्ड यात निवडून देणे जरूर आहे. त्या योगे त्यांना निर्भयता येईल. दिवसें दिवस स्त्रीयांना स्थानिक स्वराज्य संस्थेत जास्तीत जास्त जागा देणे अगत्याचे आहे. मी असे म्हणेन की, हया जागा देताना

कदाचित कायद्याने किती जागा द्यावयाच्या याबाबत तरतूद करावी लागेल. सध्या नगरपालिका व लोकबोर्डामध्ये 50 सभासदामध्ये एखादी स्त्री सभासद असते किंवा एखाद्या ठिकाणी दोन स्त्रीया असतात. आमच्या सोलापूर जिल्हयात 41 मेंबरमध्ये एक जागा स्त्रीयासाठी आहे. स्त्रियासाठी कांही तरी राखीव जागा पाहिजे म्हणजे कोणी ना कोणी स्त्री उभे राहील. हरिजन, शेडयुल कास्ट, शेडयुल ट्राईब्सकरिता ते समाज इतरांबरोबर येतील म्हणून राखीव जागा असणे आवश्कय आहे. त्याचप्रमाणे स्त्रीयाबाबतीत राखीव जागा असणे आवश्यक आहे. कारण दोघांना हक्क सारखेच आहेत. असे आपण म्हणतो. पण एवढयांना प्रतिनिधीत्व देणे शक्य नाही. सध्या जे प्रमाण आहे ते अपुरे आहे म्हणून हळू–हळू का होईना हे प्रमाण वाढवले पाहिजे.

तेव्हा माझी अशी विनंती आहे की, लोकबोर्ड नगरपालिका व इतर स्थानिक संस्थात स्त्रीयाकरिता राखीव जागांची तरतूद असणे आवश्यक आहे. सध्या त्यांच्या साठी ज्या जागा आहेत त्यांच्या दुप्पट तरी जागा कराव्यात व याकडे प्रांतीक सरकारने लक्ष घालून स्त्रीयांना राखीव जागा द्याव्यात असे श्री. तुळशीदास जाधव यांनी आपले मत मांडले. [15]

शेतकरी कर्जदारांना सवलती देणेबाबत –

मुंबई विधीमंडळाचे पुणे येथे भरलेल्या पावसाळी अधिवेशनात जे बील मांडले त्यावर आपले मत व्यक्त करताना ते म्हणाले, जे बील मांडले आहे ते "A Bill to amend the Bombay Agricultural Bebtors Relief Act 1947 " असे आहे म्हणजे जे कर्जदार आहेत त्यांना सवलती देणे हा कायद्याचा मुळ उद्देश आहे. परंतु आतापर्यंत गेली दोन–तीन वर्ष जे अर्वाडस्

झाले ते रजिस्टर झाले नाहीत. त्यामुळे शेतक–यांच्या ताब्यात जमीनी मिळत नाहीत. अर्ज करण्याकरिता लोकांचे हजारो रूपये खर्च झालेले आहेत अशी आज परिस्थिती आहे. शेतकरी हे अशिक्षित व अडाणी असल्यामुळे त्यांना हे अर्ज कसे करावे हे समजत नाही. अशी परिस्थिती मर्ज्ड स्टेटमध्ये होऊ नये म्हणून 13 व्या कलमामुळे कर्जदारांना सहा महिन्याची मुदत वाढवून दिली असेल तर ती समजू शकतो. सावकार शहाणे असतात एवढेच नव्हे तर क्रुर आणि जुलमी असतात. त्यांच्या जाचातून शेतक–यांना सोडवण्याकरिता आपण हा कायदा केला होता. पण 13 व्या कलमात हे ध्येय दिसत नाही. या कलमाप्रमाणे सहा महिन्याची मुदत दोघानाही दिली आहे. तेव्हा चालू मुदतीत सावकारांनी जी काय काळजी घ्यावयाची असते ती त्यांनी घेतली आहे. या खात्याचे मंत्री जेव्हा सावकाराकडे गेले होते तेव्हा त्यांनी त्यांच्या अडचणी त्यांना सांगितल्या व त्याचा परिणाम म्हणून ही सहा महिन्याची मुदत वाढवली गेली आहे. माझे म्हणणे असे आहे की, जी मुदत वाढवायची आहे ती सावकाराकरिता न वाढवता कर्जदाराकरिता वाढवावी. स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस् ॲन्ड रिझन्स मध्ये 13 व्या कलमाबद्दल असे म्हटले आहे की, कर्जदारांना ही सवलत दिली आहे. पण प्रत्यक्ष ॲमेंडमेंटमध्ये डेटर्स ॲन्ड क्रेडीटर्स असे म्हटले आहे. पुढे असे म्हटले आहे की, कायद्याप्रमाणे अर्जदार हा अर्ज करण्यापूर्वी दोन वर्ष शेती करत असला पाहिजे. तो जर अर्ज करण्याच्या अगोदर तीन वर्ष शेती करत असेल तर त्याला अर्ज करता येत नाही. याच प्रमाणे जे शेतमजूर आहेत ते सुध्दा अर्ज करण्याच्या दोन वर्ष अगोदर शेती करीत असेल पाहिजेत की काय याबद्दल या कायद्यात कांहीच खुलासा केलेला नाही. त्यामुळे एखाद्या शेत मजुराने शेती करायचे सोडले असेल तर किती वर्षपर्यंत त्याला अर्ज करता येईल याचा उलगडा या बिलावरून होत नाही. तेव्हा याचा खुलासा व्हावा असे मला वाटते. कोर्टाला अर्जाच्या कोणत्याही स्टेजमध्ये एखाद्या

सावकाराने त्या अर्जात आपल्याला पार्टी म्हणून नमुद करावे अशी विनंती केल्यास त्याचे नाव क्रेडीटर्सच्या यादीत घालता येईल. ही जी सावकारांना सवलत देण्यात येते ती योग्य नव्हे असे मला म्हणायचे आहे.

सरकारतर्फे जी उपसूचना आणली गेली आहे त्यामध्ये सावकार व कर्जदार या दोघांना सारखेच तत्व लावण्याचा हेतु आहे. कायदा करून आपण ज्या कांही सवलती देतो त्या–त्या वर्गासाठी मुख्यतः कायदा करावयाचा त्या वर्गाला मिळाल्या पाहिजेत. आपणही जी दुरूस्ती करत आहोत तीचा अर्थ अजून मर्ज्ड एरियामध्ये पुष्कळाना समजलेला नाही. मर्ज्ड एरियामधून जे सन्माननीय सभासद आपल्या सभागृहात आलेले आहेत त्यांची बोलण्याची व आपले विचार प्रदर्शीत करण्याची पध्दत पाहिली तर त्या भागात आणखीन विकसित झालेली नाही. सहा महिन्याच्या आत अर्ज केला पाहिजे ही गोष्ट सरकारने गॅझेटमधून कितीही जरी प्रसिध्द केली असली तरी मागासलेल्या जनतेपर्यंत ती जाऊन पोहचत नाही. या बिलास ज्याप्रमणे अर्ज करण्याबाबत कर्जदाराला सवलत आपण देत आहोत त्याच प्रमाणे सावकारालाही सवलत देण्यात येत आहे. सावकारालाही सांभाळायचे आणि कुळालाही सांभाळायचे असे म्हणू लागले तर ते जमणे शक्य नाही. दोन्ही पार्टीज समान भूमिकेवर असल्या तरच त्यांना समान सवलती देणे योग्य आहे. पण सावकार हा कुळाच्या जीवावर असल्याने दोघाना सारख्या सवलती दिल्या तर कुळांना कांही एक फायदा मिळणार नाही. तेव्हा मी जे सुचवले आहे सरकारने स्वीकारले तर या कायद्याचा जो मूळ हेतु आहे तो सफल होईल आणि त्यामुळे जनतेचे हित होईल असे श्री. तुळशीदास जाधव यांनी सरकारला सांगितले. [16]

प्रवास बील –

मुंबई विधीमंडळामध्ये कॉंग्रेस पक्षाच्या असेंब्लीतील सभासदांनी प्रवास बील वाढवून मागणारे बील सभागृहापुढे मांडले आहे. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले, या सभागृहाच्या सभासदांनी प्रवास बील मांडले तेव्हा त्यास तुळशीदास जाधवांनी विरोध केला व ते म्हणाले की, या सभागृहाच्या सभासदांना प्रवास भत्ता किती घ्यावयाचा याबद्दल असे म्हटले की, एखाद्या सभासदांच्या मनात आले तर तो फर्स्ट क्लासच्या फेअरच्या डबल सुध्दा टी.ए. क्लेम करू शकेल तर दुसरा एखादा सेकंड क्लासचा फेअर डबल टी.ए. क्लेम करीत. कारण यात निश्चित स्वरूपाची अशी तरतूद केलेली नाही. सर्व कांही सभासदांच्या इच्छेवर अवलंबून ठेवलेले आहे. तसे असता कामा नये असे माझे म्हणणे आहे. पूर्वीच्या कायद्यात असे म्हटले होते की, सेकंड क्लासच्या दीडपट टी.ए. आकारावा. आता मात्र एखाद्याला फर्स्ट क्लासच्याही दुप्पट टी.ए. आकारता येईल व त्यालाच माझा विरोध आहे. परवा मुंबई कार्पोरेशन बिलावर बोलताना सन्माननीय सभासद श्री. सिलम म्हणाले होते की, सन्माननीय सभासदांनीही भत्ता कमी घ्यावा आणि त्या हेतूने जर हे बिल आणले गेले असते तर त्याला माझी कांही हरकत नाही. परंतु जे काही करावयाचे असेल तर निश्चित स्वरूपाचे असावे असे माझे म्हणणे आहे.

श्री. कुंटे यानी जी अमेंडमेंट आणली आहे तीने फस्ट क्लास दुप्पट सुध्दा घेता येतो तसे असू नये. परवा सन्माननीय सभासद श्री. सिलम हे भत्ता सोडा पगार सोडा असे मलाच सांगत आहेत. या अमेंडमेटचा परिणाम असा होईल की, एखाद्या सभासदाला वाटले तो फर्स्ट क्लासच्या

भाडयाच्या दीडपट टी.ए. मागू शकेल तेव्हा माझे असे म्हणणे आहे की फर्स्ट क्लासच्या भाडयाच्या दीडपट टी.ए. कोणालाही क्लेम करता येऊ नये.[17]

असोसिएशन बिल –

विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना असोसिएशन बिलाबाबत आपले विचार व्यक्त करताना असे म्हटले "हया बिलामधील सप्लीमेंटरी ग्रॅटस् जेव्हा या सभागृहापुढे मांडण्यात आले होते तेव्हा मी माझे विचार व्यक्त केले होते. ज्याअर्थी त्याच मागण्या या बिलाच्या रूपाने पुन्हा सभागृहापुढे आल्या आहेत. त्याअर्थी त्यापैकी एक दोन गोष्टी मी सरकारच्या नजरेस आणू इच्छितो, गेल्या सहा महिन्यापासून सूत वाटपाचे काम सरकारने आपल्या हातात घेतले आहे. त्याचप्रमाणे ठिकठिकाणी ज्या को–ऑपरेटीव्ह सोसायटया आहेत त्यांच्याकडे ही हे वाटपाचे काम सोपवलेले आहे असे म्हटले आहे.

अध्यक्ष महाशय एक दोन दिवसापूर्वी घडलेली सुताबाबतची हकीगत कदाचित मंत्रीमहोदयांच्या कानावर आली असेल असे मी धरून चालतो. इचलकरंजीमधील हातमागवाल्यांना सुत मिळत नाही म्हणून त्यांनी नुकताच मोर्चा काढला होता व या बाबतीतले एक पुस्तक मंत्रीमहोदयांच्या हातात दिले आहे. मी जेव्हा दोन दिवसापूर्वी त्या गावाला गेलो होतो तेव्हा तेथे मी जी हकिगत कळली ती अशी की त्या ठिकाणी जवळ–जवळ तीन चार हजार माग आहेत. पण त्यांना पुरेसे सुत मिळत नाही. त्यांनी जो सूत मार्चा काढला होता त्याचे मुख्य कारण सुताबाबतची ही परिस्थिती सरकारच्या नजरेत आणणे हे होते. प्रत्येक मागावर चार पाच माणसे

जगतात. असे असताना पहिल्या मागाला 30 पौंड सुत, दुस–या मागाला 20 पौंड सुत व त्यापुढे पौंड अशी वाटणी करण्यात येते. म्हणजे प्रत्येक मागाला दररोज जे अडीच किंवा तीन पौंड सुत मिळते त्यावर चार–पाच माणसे पोट कशी काय भरणार याचा सरकारने विचार केला पाहिजे. पुष्कळ माणसांवर उपाशी राहण्याची वेळ आली आहे. इचलकरंजीला तर सुताच्या अभावी कामधंदा नसल्यामुळे तेथील माणसे गांव सोडून बाहेर जाऊ लागली आहेत. हातकामगारांना 30, 20 आणि 15 पौंड असे सुत दिले जाते. पण जे पॉवरलुम आहेत त्यांना मात्र 80 व 60 या प्रमाणात सुत दिले जाते. हा जो फरक आहे तो मला सरकारच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. हातमागांना आणि सर्वसाधारणपणे कॉटेज इंडस्ट्रीजना उत्तेजन देण्याचे सरकारचे धोरण आहे असे सांगितले जात असताना हातमाग आणि पावरलुम्स यामध्ये सुताच्या वाटपात असा भेद का करण्यात येतो हे मला समजत नाही. हातमागाच्या धंद्यावर पॉवरलुम्स धंद्या पेक्षा जास्त मानसे जगतात म्हणून त्या धंद्याला जास्तीत जास्त संरक्षण देणे गरजेचे आहे व हे सरकारचे कर्तव्य आहे.[18]

मुंबई विधीमंडळामध्ये 1952 मध्ये चर्चा सुरू असताना त्यांनी वृत्तपत्राबरोबरच साप्ताहिके व मासिके या वरील विक्रीकर माफ व्हावा अशी मागणी केली होती. पंचवार्षिक योजनेच्या पुर्ततेसाठी थेडीबहुत करवाढ सरकारला करावी लागेल हे आम्हाला मान्य आहे. परंतु ज्या करवाढीने कर देणा–याचे अस्तित्वच धोक्यात येणार आहे. त्या कराची अंमलबजावणी करताना सरकारने दोनदा विचार केला पाहिजे.

आज बहुतांश साप्ताहिकांचा व मासीकांचा संसार हा कसाबसा चालू आहे. खर्च व उत्पन्नाची तोंड मिळवणी करणे मुश्कीलीचे होत आहे. अशा परिस्थितीत सरकारची गरज एकवेळ

योग्य आहे असे समजले तरी नियतकालिकावरील विक्रीकराच्या स्वरूपात तिला मान्यता देणे नियतकालिकाच्या शक्तीबाहेरचे आहे. मासिके वृत्तपत्रे यावरील करविरोधी भाषणात सरकारला सांगितले "सरकारने कर गोळा केल्याशिवाय सरकार चालणार नाही हे खरे असले तरी सरकारला विविध योजनाबरोबर लोकहितकारी कामांबरोबर ज्ञानदानाचेही काम करावे लागते. हे काम प्राथमिक शाळा प्रशाला महाविद्यालये, विद्यापीठ यांच्याकडून चालू आहे. तो खर्च सरकारला परवडत नाही म्हणून लोकांचा विरोध असताना दारूची दुकाने उघडून त्यात मिळालेला पैसा शिक्षण कार्यासाठी खर्च केला जातो असे मंत्र्याकडून बोलले जाते याचा अर्थ "बापाला दारू पाजून मुलाला शिक्षण देणे" असा होतो. या बाबत सरकारने पुन्हा विचार करावा व कर वसुलीची पध्दत बदलावी.

ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारी मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे ही जनतेनेच काढलेली आहेत. सरकारच्या ज्ञानाच्या कार्यास सर्वांची नित्य मदत होत असते हे काम सरकारचा धर्म असताना ते करू शकत नसेल, त्या ठिकाणी कार्यकर्ते, पुढारी हे ज्ञानदानास मदत करतात त्यांचेही आभार मानले पाहिजेत. आपण ते करता. कर लादून ज्ञानदानाची साधने बंद करण्याचाच एक प्रकारे प्रयत्न करतो. हे अत्यंत चुकीचे आहे. अशा आशयाचे भाषण करून वृत्तपत्रावरील मासिकावरील कर त्वरीत रद्द करावा अशी सरकारकडे तुळशीदास जाधव यांनी मागणी केली. [19]

भारतामध्ये पहिल्यांदा दि. 16 एप्रिल, 1953 रोजी मुंबई ते ठाणे या मार्गावर रेल्वे सुरू झाली. रेल्वेतून प्रवास करताना प्रवाशांनी कोणती काळजी घ्यावी, प्रवाशाकडून रेवेच्या काय अपेक्षा आहेत या संबंधीच्या सूचना डब्यातच लिहिलेल्या असतात. पण प्रवाशाकडून त्याचे तंतोतंत

पालन केले जाते असे नाही. धुम्रपान करू नका, आवश्यकता नसल्यास दिवे पंखे बंद करा, महिलांच्या डब्यातून प्रवास करू नका. डब्यातून स्पोटक वस्तू नेऊ नका या सुचनेप्रमाणे आपण वागतो. हे पाहणे आवश्यक आहे.

केवळ औषधोपचारच नव्हे तर ऑपरेशनचीच सोय असलेली जणू फिरता दवाखानाच अशी एक सुसज्ज रेल्वेगाडी तयार असून ती मधील डॉक्टर मार्गावरील खेडयापाडयातून लोकांच्या औषधपाण्याची उपासमारीची सोय करीत असतात. लोकांच्या जीवनाशी रेल्वे कीती समरस झाली आहे याचे हे उत्तम उदाहरणे आहे.

नॅरोगेजचे लोकांच्या मागणीप्रमाणे ब्रॉडगेज मार्गामध्ये रूपांतर करणे, गोव्यासह संपूर्ण कोकणाला जोडणारी कोकन रेल्वे असे लोकांच्या सुखसोयीचे मोठे प्रकल्प रेल्वेने हाती घेतले आहेत. त्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारची कामे तुळशीदास जाधव यांनी जनतेसाठी केली आहेत. त्यांनी शाळा व महाविद्यालयामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना व्याख्याने आयोजित करून रेल्वेचे नुकसान थांबवण्यासाठी काय उपाय केले पाहिजेत या विषयी सांगितले. भारतीय रेल्वेचे प्रवासी खास करून विद्यार्थीवर्ग आहे त्यांना रेल्वेगाडी ही आपल्या देशाची मालमत्ता आहे व रेल्वेचे नुकसान करू नये यांनी सांगितले.[20]

मुंबई असेंब्लीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांच्या व मंत्र्यांच्या भत्त्याबाबत चर्चा चालू असताना आपले परखड विचार मांडताना ते म्हणाले, आपल्या सभागृहामध्ये निवडून आलेल्या सभासदापैकी प्रमुख आणि मुंबई इलाख्याचे आदर्श नागरिक मानलेले मंत्रीमहोदय यांना सध्याच्या महागाईच्या दिवसात आपले जीवन जगणे कठीण झाल्यामुळे त्यांच्या पगारात आणि इतर

अलौन्ससमध्ये वाढ करण्यासाठी जे बील सभागृहापुढे मांडण्यात आले आहे त्या संबंधी माझे विचार प्रदर्शित करण्यासाठी मी उभा आहे. हे बील आणण्यात मंत्र्यांनी फार घाई केली असे मला वाटते. शेतकरी शेतात काम करून सायंकाळी पगार घेतो. कामगार आणि इतर नोकरवर्ग महिन्यानंतर आपले वेतन घेतो आणि एक वर्षाचे काम पाहून त्याचा पुढील पगार निश्चित केला जातो. पण मंत्री महोदय म्हणतात की, आमचा पुढील 5 वर्षाचा पगार अगोदर ठरवा म्हणजे आम्ही कामाला लागू अशीही नवीन प्रथा सुरू केलेली दिसते. मला असे वाटते की, कॉंग्रेसकडूनपूर्वी जी तत्वे प्रतिपादली गेली त्यात आता कांही सार उरला नसावा. कारण प्रत्येकजन स्वतःच्या स्वार्थाकडे वळू लागला आहे. प्रांतातील प्रमुख नागरिकांनी कसे वागावे या बाबतीत जगातील इतर राष्ट्रांचा आधार देण्यापेक्षा ज्या महात्माजींच्या नावावर आणि तत्वावर हे सरकार चालते त्यांच्या लिखानाचा आधार दिला तर तो अधिक उपयुक्त होईल अशी माझी समजूत आहे. मंत्र्याचा पगार कशासाठी वाढवायचा हा विचार सभागृहाने करणे उचित आहे. सध्याचे जीवन फार कठीण आहे असा मंत्रीमहोदयावरून अनुभव येऊ लागला आहे. या ठिकाणी जे नवीन मंत्री आलेले आहेत त्यांचा अनुभव काय आहे हे मला माहित नाही. पण जुन्या मंत्र्यानी हे बील मांडले आहे. त्यावरून त्यांना असलेल्या पगारात त्यांचे भागत नाही हे उघड होते. मंत्रीमहोदयाना रहाण्यासाठी घर व फिरण्यासाठी मोटारी त्यांना सरकारी तिजोरीतून खर्च करून दिल्या जातात. तरी ही त्यांना खर्च काय येतो हेच मला समजत नाही. मोटारीसाठी लागणा–या पेट्रोलचा दर 1–6 आणे होता तो 2–12 आणे झाला. म्हणजे दर गॅलनमागे 1–6 आणे वाढले असे सांगण्यात आले. पण मंत्रीमहोदयांनी पंतप्रधानापासून ते शेवटच्या बाकावर बसलेल्या मंत्र्यापर्यंत प्रत्येकाने इतका प्रवास केला व त्यासाठी त्यांना इतके पैसे जास्त खर्च करावे लागले असे कोठेही दाखले नाहीत.

पगारवाढ करण्यासाठी कोणतेही कारण दाखवण्यात आलेले नाही. मला मंत्री महोदयाना विचारावयाचे आहे की, आतापर्यंत जी बीले सभागृहापुढे मांडली गेली ती अशीच मोघम स्वरूपात मांडली गेली होती काय ? गेल्या पाच वर्षाचा अनुभव असा आहे की, बील मांडताना कांहीना कांही कारण सभागृहाला मांडण्यात आले होते तसे कांही कारण न देता बील मांडू शकले तर लोकशाहीवर लोकांचा विश्वास बसणार नाही . अशा प्रकारचे परखड मत तुळशीदास जाधव यांनी व्यक्त केले.[21]

मी विधीमंडळामध्ये असे सांगू इच्छितो की, ज्यावेळी एखाद्या ठिकाणी समारंभ घडून येतात. तेथे आपले मंत्रीमंडळाचे मंत्रीमहोदय दिसून येतात. पूर्वी समारंभाला देवाची पुजा करून सुरूवात होत होती. पण कॉंग्रेसच्या राज्यात ही प्रथा बंद पडून समारंभास मंत्री महोदय उपस्थित असले की कोणत्याही देवाची जरूरी लागेनाशी झाली आहे. मंत्र्यांनी समारंभास जाण्यास माझी हरकत नाही. कारण वृत्तपत्रामध्ये त्यांची नांवे आणि फोटो छापून येतात व त्यांना प्रत्यक्ष पाहावे अशी जिज्ञासा लोकामध्ये असणे स्वाभाविक आहे. पण माझे म्हणणे एवढेच आहे की, लोकांना भेट देण्यासाठी सणावारी केंव्हातरी त्यांनी जावे. ब्रिटीश राज्य असताना त्यांच्या बाजूने काम करणारे कांही लोक आहेत. जिल्हयाचे कमीशनर, कलेक्टर किंवा येथे बसलेले सरकारी अधिकारी जे कायद्याचा किस काढण्यात तक्ष आहेत. त्यांच्यापैकी कोणीही समारंभास गेल्याचे मी ऐकले नाही. परंतु आमचे मंत्रीमहोदय प्रत्येक समारंभास उपस्थित असतात आणि पगाराशिवाय भत्त्याची मागणी करतात.

आज खेडयापाडयातून अशी परिस्थिती दिसून येते की, 700 वस्तीचा गांव असला आणि तेथे एखादी शाळा बांधली गेली तर दरवाजा उघडण्यास मंत्रीमहोदय हजर असतात. येथे त्यांच्या

सरबराईसाठी किती तरी खर्च होतो आणि त्याशिवाय टी.ए.डी.ए. म्हणून सरकारी तिजोरीवर ताण पडतो. शाळेचा दगड बसवायचा किंवा शाळेचे उद्घाटन करायचे यासाठी मंत्रीमहोदयांनी जाण्याची काय गरज आहे ? तेव्हा हा खर्च विनाकारण होत आहे असे मला सांगायचे आहे. सरकारी पक्षाचे हया सभागृहामध्ये बहुमत आहे. तेव्हा कोणतेही बील पास होणार ही गोष्ट उघड आहे. पण त्या पार्टीच्या सभासदांना पार्टी मिटींगमध्ये विचारले तर तेही आमच्याप्रमाणे बोलून दाखवतील. तेव्हा सरकारने ही गोष्ट विचारात घ्यावी असे मला सांगायचे आहे. अशा प्रकारचे परखड मत तुळशीदास जाधव यांनी व्यक्त केले.[22]

तुळशीदासजींनी ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, पोलंड, पूर्व जर्मनी, प. जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, स्वीत्झर्लंड, ब्राझील अशा निरनिराळया देशातील राजकीय परिस्थितीची शेतकरी कामगारांच्या परिस्थितीची व इतर विषयाची माहिती मिळविली. व्हिएन्ना येथे दि. 18 डिसेंबर, 1950 रोजी जागतिक ट्रेड युनियनच्या कार्यकर्त्यांनी जी बैठक भरवली होती त्या बैठकीला तुळशीदासजींना सन्मानपूर्वक आमंत्रण देऊन बोलावून घेतले होते व तेथे त्यांनी भाषण केले.

व्हिएन्ना येथील भाषण –

''हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढयात इंग्रजाशी लढण्यात माझ्या आयुष्याची 20/25 वर्ष खर्च झाली. 1930 साली सोलापूर शहरात मार्शल लॉ पुकारला होता. त्यावेळी एका सोल्जरने माझया छातीवर बंदूक रोखून गांधी टोपी काढण्यास सांगितले. परंतु मी गांधी टोपी काढली नाही. त्यामुळे मला 10 वर्षाची शिक्षा व 3000 रूपये दंड झाला. सत्तेवर राहिल्यानंतर फायदा तर मिळतोच,

सत्ताधारी कॉंग्रेसचा कारभार शेतकरी व शेतमजुर यांच्या हिताविरूध्द होत असलेला पाहून त्याविरूध्द आवाज उठवण्यासाठी कम्युनिष्टांच्या तत्वावर काम करणा–या अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेत भाग घेतला. सध्या त्या पक्षातर्फे मुंबई विधानसभेत विरोधी पक्ष नेता म्हणून मी काम करत आहे. भांडवलाशाही विरूध्द लढण्यासाठी कम्युनिष्टांची तत्वे अत्यंत उपयोगी आहेत. सर्वसामान्य लोकांचे साम्यवादाशिवाय कल्याण होणार नाही. असा माझा दृढ विश्वास आहे. जनतेच्या भल्यासाठी भांडवलशाही विरूध्द लढण्यासाठी मी कार्य करत आहे.

शेतकरी कामगार पक्षाद्वारे या कम्युनिझमच्या तत्वाचा जास्तीत जास्त प्रसार करणे, सर्व डाव्या आघाडया एकत्र आणणे आणि हे आंदोलन शांततेच्या मार्गाने करणे हे माझे पुढचे काम आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर कोणत्याही माणसाने आपल्या ताकदीनुसार कांहीना कांही कार्य केले पाहिजे आणि अशा प्रकारे कार्य केल्याशिवाय त्या माणसाला जगातल्या सुखाचा उपयोग घेण्याचा कांही एक अधिकार नाही. आपल्या स्वतःच्या उन्नतीत जगाचा फार मोठा हिस्सा आहे. जेव्हा जगाच्या कल्याणासाठी आपण कांहीतरी करू इच्छितो तेव्हा या अडचणी येतातच तेव्हा आपण या अडचणींना समोर जाऊन आपले काम केले पाहिजे. यावर सर्व भांडवलदारी देश विचार करत आहेत. अशा परिस्थितीत या शांतता परिषदेचे काम वाढत आहे. शांततेचा संदेश जगाच्या कानाकोप–यात पोहचवण्याचे काम असेच वाढत जाणार आहे. कोरियासारख्या देशातील बंधुभावाने संघटनाच्याद्वारे लढत रहातील आणि रशिया चीनसारखे लोकांचे राज्य असलेले देश त्याकडे सहानुभूती व मदत करण्याच्या दृष्टीकोनातून पहात रहातील तर 1953 मध्ये नाही. परंतु त्यापुढे ही युध्द होणार नाही अशी मला आशा वाटते.[23]

1952 साली परदेशात जाण्याची संधी त्यांना मिळाली. व्हिएन्ना येथील जागतिक शांतता परिषदेच्या निमित्ताने हा दौ–याचा कार्यकाल शासनामध्ये आखला होता. या हिंदी प्रतिनिधीत्व मंडळाचे नेतृत्व श्री. किश्चल यांच्याकडे होते. व्हिएन्ना परिषद संपल्यानंतर त्यांनी रशिया, इंग्लंड, स्वीत्झर्लंड, फ्रान्स, इटली, ऑस्ट्रेलिया वगैरे देशात त्यांनी प्रवास केला.

कॉंग्रेसमध्ये प्रवेश –

दि. 10 ऑगस्ट 1955 रोजी सोलापूर जिल्हा किसान कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन तुळशीदासजींनी आपली भुमिका विषद केली. तेव्हा तुळशीदासजींच्या या विचाराला अनेक कार्यकर्त्यांनी अनुकुलता दर्शवली. तेव्हा सर्वानुमते कॉंग्रेस प्रवेश निश्चित झाला. आपल्या बहुतेक सर्व निकटवर्तीय पक्ष सहकार्याशी विचार विनिमय केल्यानंतर 29 सप्टेंबर, 1955 रोजी तुळशीदासजींनी आपल्या भुमिकेचे स्पष्टीकरण देणारे पत्रक प्रसिध्द केले आणि त्याच दिवशी म्हणजे 29 सप्टेंबर, 1955 रोजी सकाळी 8.30 वाजता पुणे येथील "कॉंग्रेस भवन" मध्ये तुळशीदासजींनी शेतकारी कामगार पक्षाचा त्याग करून कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. या समारंभाला श्री. यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र प्रांतीक कॉंग्रेसचे चिटणीस श्री.बाळासाहेब देसाई, बाळासाहेब भारदे इ. अनेक नेतेमंडळी उपस्थित होते.

पुण्यातील कॉंग्रेस प्रवेशाचा समारंभ आटोपल्यानंतर तुळशीदासजी सोलापुरला आले तेव्हा स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्यासाठी कॉंग्रेस पुढारी कॉंग्रेस कार्यकर्ते, गिरणी कामगार इ. अनेक चाहते स्वागत करण्यासाठी हजर होते. त्या सर्व जनसमुदायापुढे आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले, "यापुढील माझे आयुष्य कॉंग्रेसमध्ये राहून देशाची व जनतेची सेवा करण्यात मी खर्च

करीत. कोणी म्हणतील की एखाद्या अधिकाराच्या जागेच्या अभिलाषेने मी कॉंग्रेस प्रवेश केला. पण त्यांना मी नम्रपणे सांगू इच्छितो की, कोणत्याही अमिषाने मी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला नसून केवळ जनतेच्या सेवेसाठी व भारताच्या विकासासाठी कॉंग्रेसचे व पं. नेहरूंचे धोरण व कार्यक्रम योग्य आहे. अशी माझी खात्री झाली म्हणून मी कॉंग्रेस प्रवेश केला. आपण माझ्यावर सर्दव प्रेम ठेवावे व सेवा करून घ्यावे ही विनंती.

तुळशीदासजींच्या कॉंग्रेस प्रवेशाबद्दल सर्वत्र स्वागत केले जात होते. पुण्यातील "लोकशक्ती" या दैनिकामध्ये तुळशीदासांच्या कॉंग्रेस प्रवेशावर मत व्यक्त करताना म्हटले, "शेतकरी कामगार पक्षाचे नेते तुळशीदासजींनी अगोदर पत्रक काढून कॉंग्रेस पक्षात जाण्याची इच्छा व्यक्त केली व नंतर प्रवेश केला. यापूर्वीच ते कॉंग्रेसमध्ये प्रवेश करणार होते. पण मध्यंतरी राज्य पुर्नरचना मंडळाच्या शिफारशीचे अंदाज प्रसिध्द होऊ लागले तेव्हा तुळशीदासांनी विचार करण्याची भुमिका घेतली. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी सुध्दा सर्व लोकांनी कॉंग्रेसमधूनच प्रयत्न केले पाहिजेत. तेव्हा आज तुळशीदास जाधव हे कॉंग्रेसमध्ये आले तेथे त्यांचे स्वागतच होणार आहे. [25]

मुंबईच्या दैनिक लोकमान्यमध्ये म्हटले आहे की, मुंबईच्या विधानसभेतील विरोधी पक्ष नेते श्री. तुळशीदास जाधव यांनी विधीपूर्वक कॉंग्रेस प्रवेश केला आहे. महाराष्ट्रातील राजकारणाचा विचार करता या घटनेला विशेष महत्व आहे. श्री. तुळशीदास जाधव यांची वैयक्तिक प्रतिष्ठातर आहेच शिवाय ज्या शेतकारी कामगार पक्षाचे ते नेतृत्व करत होते तो पक्षही वजनदार पक्ष होता. निवडणूकीनंतर या पक्षातील नेत्यांची वैयक्तिक मतभेद झाल्यामुळे कांहीनी पक्ष सोडला. कांहीनी

स्वतंत्र पक्ष स्थापन केला. कांहीनी कम्युनिष्ट पक्षात प्रवेश केला तर कांहीनी परत कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. परंतु श्री. तुळशीदास जाधव हे कोणत्याच पक्षात प्रवेश करत नव्हते. परंतु ज्या ध्येयासाठी आपण कॉंग्रेसपक्ष सोडला ते ध्येय जर कॉंग्रेसपक्षामध्ये जाऊन साध्य होत असेल तर आपण प्रवेश करावा असा विचार करून त्यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला.[26]

अशा प्रकारे श्री. तुळशीदास जाधव यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर वेगवेगळ्या स्तरातून त्यांच्या प्रवेशाचे सर्वत्र स्वागत होऊ लागले.

संयुक्त महाराष्ट्र समितीतील भूमिका –

1957 हे साल महाराष्ट्राच्या दृष्टीने संघर्षाचे आणि चळवळीचे होते. उभा महाराष्ट्र पेटलेला होता. महाराष्ट्रातील मराठी माणूस जागा झाला होता. बेळगाव निपाणी, कारवार सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही महाराष्ट्राची मागणी होती. त्यावेळी पुणे, मुंबई, सोलापूर, सातारा, खानदेश इत्यादी शहरे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने पेटली होती. जनतेच्या जिव्हाळयाचा व भावनेचा तो प्रश्न होता. प्रथम संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर कॉंग्रेससह सर्व राजकीय पक्ष एकत्र आले व या समितीचे अध्यक्ष म्हणून शंकरराव देव यांच्या खांद्यावर ती जबाबदारी टाकण्यात आली. परंतु पुढे कांही मतभेद झाल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीची जबाबदारी श्री. एस्.एम्. जोशी यांच्या खांद्यावर येऊन पडली. कै. भाऊसाहेब हिरे, शंकरराव मोरे, श्री. तुळशीदास जाधव ही कॉंग्रेसमधील मंडळी संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने असली तरी ती संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये गेली नाहीत. मा.श्री. तुळशीदास जाधव यांच्या नेतृत्वाखाली प्रथम बेळगाव येथे संयुक्त

महाराष्ट्राच्या बाजूने परिषद भरली. व श्री. पारसकरांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले. याच सुमारास महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे नेते श्री. स.का. पाटील, श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. मोरारजी देसाई इत्यादि लोकांची मते भडकावणारी भाषणे देत होती. कॉंग्रेसमधील कांही नेते सांगत होते की, कांहीही झाले तरी संयुक्त महाराष्ट्र मिळणार नाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ दडपून टाकण्यासाठी मुरारजीभाई सरकारने एकशे पाच नागरिकांचे बळी घेतलेले होते. त्यामुळे जनता त्यांच्यावर चिडली होती.[27]

अशा प्रकारच्या घडामोडी होत असताना मा. श्री. तुळशीदास जाधव यांनी महाराष्ट्र कॉंग्रेसचे द्विभाषिक राज्य स्वीकारण्याचे आवाहन केले व ते म्हणाले, श्री. पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी लोकसभेमध्ये असे वक्तव्य केले की, द्विभाषिक मुंबई राज्याची योजनाच अस्तित्वात येण्याची अधिक शक्यता दिसत आहे. अशावेळी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसने सुचविलेली विदर्भासह द्विभाषिक योजनाच मान्य करावी. पंडीत नेहरूनी आपले वजन खर्च करून गुजरात, कॉंग्रसेला ही योजना मान्य करावयाला लावली. सर्व मराठी आणि गुजराती भाषिक एकत्र आले तर मताधिक्य मराठयांचे होईल अशी भिती बाळगणा–या गुजरातने आपल्या हितरक्षणार्थ करार करून घ्यावेत आणि द्विभाषिक राज्यात मराठी भाषिकांशी खांद्याला खांदा लावून नांदावे असे नाहीतर मुंबईचा महाराष्ट्रात समावेश होऊ द्यावा. गुजराती बांधवाची तयारी नसेल तर आजच्या या प्रश्नामुळे निर्माण झालेल्या आणि आणीबाणीच्या परिस्थितीत गुजराती बांधवानी महागुजरात मान्य करावा आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रास मान्यता द्यावी. मुंबई बाबत त्यांच्या हितसंबंधाच्या रक्षणाकरिता त्यानी कराराने महाराष्ट्रास बांधून घ्यावे. गुजरात, महाराष्ट्र व मुंबई कॉंग्रेस

कमिटयानी एकत्र येऊन हा प्रश्न धसाला लावावा व आपण महाराष्ट्र कॉंग्रेसशी एकनिष्ठ आहोत. असे पत्रकार परिषदेत संयुक्त महाराष्ट्राबाबत केले.[28]

संयुक्त महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापत होते व त्याच वेळेस 1957 ची सार्वत्रिक निवडणूकीचे रणशिंग फुंकले गेले आणि या निवडणुकीत सामोरे जाण्याची सर्व जबाबदारी श्री. तुळशीदास जाधव यांच्यावर येऊन पडली. कॉंग्रेस पक्षाची जबाबदारी खांद्यावर घेऊन ते खेडोपाडी जाऊन आपली भुमिका विषद करत होते. या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीने महाराष्ट्रामध्ये ब–यापैकी स्थान निर्माण केले होते. 1957 च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये श्री. तुळशीदास जाधव हे सोलापूर जनरल लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवत होते. विधान सभेची निवडणूक ही याचवेळी होती. त्यामुळे विधानसभेची व लोकसभेची जबाबदारी तुळशीदास स्वतःच्या खांद्यावर घेऊन खेडोपाडी जाऊन प्रचार करत होते. परंतु निवडणुकीमध्ये सोलापूर जिल्हयातून विधानसभेवर कॉंग्रेसचे बहुसंख्य उमेदवार निवडून आले. परंतु श्री. तुळशीदास जाधव यांना लोकसभेमध्ये पराभव पत्करावा लागला. या निवडणुकीमध्ये सोलापूर सोडून इतर ठिकाणी कॉंग्रेसला आपले अस्तित्व टिकवता आले नाही.

मात्र या निवडणूकीने एक गोष्ट सिध्द झाली की, ज्या पक्षाचे तुळशीदास जाधव त्या पक्षाचा सोलापूर जिल्हा. या प्रमाणे यावेळेसही सोलापूर जिल्हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला ठरला व तुळशीदासजींने महाराष्ट्रातील नेत्यांना सोलापूर जिल्हयातील आपले स्थान कायम ठेवले. ते पराभवाला न खचता त्यांनी आपले काम जोमाने सुरूच ठेवले.[29]

प्रांतीकचे सरचिटणीस –

महाराष्ट्रातील कॉंग्रेसपक्षाला नवसंजिवनी आणायची असेल तर एकच व्यक्ती आहे व ती म्हणजे तुळशीदास जाधव. त्यांचा फायदा पक्षाला मिळावा म्हणून त्यांना कॉंग्रेस कमिटीमध्ये महत्वाचे पद देण्याचे ठरवले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या नवीन सभासदांची बैठक 27 डिसेंबर, 1957 रोजी घेण्यात आली. त्यामध्ये श्री मालोजीराव नाईक निंबाळकर यांना अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. प्रदेश कार्यकारी मंडळाच्या वीस सभासदामध्ये तुळशीदासजींना स्थान देण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसच्या सरचिटणीसपदी श्री. तुळशीदास जाधव यांची नेमणूक करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस झाल्यानंतर त्यांनी प्रांतामध्ये दौरा काढून लोकांना – 1) शिक्षण शिबीरे घेणे, 2) कार्यकर्त्यांचे जिल्हानिहाय मेळावे घेणे, 3) महाराष्ट्रातील निवडक कार्यकर्त्यांचे 4–5 दिवसाचे शिबीर घेणे, 4) नागपूर अधिवेशनातील शेती विषयक ठरावाचा प्रचार करणे, 5) सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांची बैठक घेणे, 6) अन्नधान्याबाबत अल्पबचत योजना व विकास कार्यात मदत करणे इ. कामे केली.

सर्व प्रांतभर कॉंग्रेस कमिटया व तालुका आणि जिल्हा कॉंग्रेस कमिटया संघटीत, व्यवस्थित व कार्यक्षम करण्यासाठी श्री. तुळशीदास जाधव यांनी जिल्हयात फिरून तालुका कॉंग्रेस कमिटयांच्या सभा घेऊन मंडळाध्यक्ष सेक्रेटरी, लोकलबोर्ड मेंबर्स, आमदार, प्रांतीक मेंबर यांच्या बैठका घेऊन प्रांतामध्ये सर्वत्र फिरून कॉंग्रेस पक्षाची ध्येय–धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे तुळशीदास जाधव यांनी आपल्या कार्याची चुनूक दाखवून कॉंग्रेस पक्ष वाढवण्याचा प्रयत्न केला.[30]

प्रकरण तिसरे

संदर्भ सूची

1. दे.भ. तुळशीदास जाधव – गौरव ग्रंथ (89), – एम्.बी. साळुंखे.
2. चणे खावे लोखंडाचे (97), – व्यं.गो. अंदुरकर
3. दे. भ. तुळशीदास जाधव – गौरव ग्रंथ (129), एम्.बी. साळुंखे,
   माझा पराभव – माधवराव मेनन
4. चणे खावे लोखंडाचे (100–101), – व्यं.गो. अंदुरकर
5. दे. भ. तुळशीदास जाधव – गौरव ग्रंथ (91), एम्.बी. साळुंखे,
6. चणे खावे लोखंडाचे (114.115), – व्यं.गो. अंदुरकर
7. आवाहन, (103–104) – दिलीप रूद्राक्ष.
8. धांगवडी, जि. पुणे, दरोडा प्रकरण – आवाहन (105) – दिलीप रूद्राक्ष.
9. चणे खावे लोखंडाचे (255–259), – व्यं.गो. अंदुरकर
10. चणे खावे लोखंडाचे (281–283), – व्यं.गो. अंदुरकर
11. चणे खावे लोखंडाचे (286–289), – व्यं.गो. अंदुरकर
12. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 16, दि. 3 मार्च, 1950, पान नं. 734 ते 737.
13. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 16, दि. 16 मार्च, 1950, पान नं. 1541 ते 1544.
14. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 16, दि. 24 मार्च, 1950, पान नं. 1848 ते 1892.

15. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 16 भाग–2 , दि. 5 एप्रिल, 1950, पान नं. 2447 ते 2449.

16. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 17 भाग–1 , दि. 4 ऑक्टोबर, 1950, पान नं. 544, 545, 553.

17. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 17 भाग–2 , दि. 25 ऑक्टोबर, 1950, पान नं. 1673 ते 1679.

18. विधीमंडळ चर्चासत्र, खंड 17 भाग–2 , दि. 26 ऑक्टोबर, 1950, पान नं. 1770 ते 1773.

19. राखावी बहुतांची अंतरे (पान नं. 9 ते 11), – तुळशीदास जाधव.

20. राखावी बहुतांची अंतरे (पान नं. 111), – तुळशीदास जाधव.

21. आवाहन, (पान नं. 93, 94) – दिलीप रूद्राक्ष – या लेखातील 7/5/1952 चे भाषण.

22. आवाहन, (पान नं. 95) – दिलीप रूद्राक्ष – या लेखातील 8/5/1952 चे भाषण.

23. चणे खावे लोखंडाचे (129–130), – व्यं.गो. अंदुरकर

24. चणे खावे लोखंडाचे (155), – व्यं.गो. अंदुरकर

25. लोकशक्ती, 30 सप्टेंबर, 1955, पुणे.

26. लोकमान्य, 2 आक्टोबर, 1955, मुंबई.

27. चणे खावे लोखंडाचे (95), – व्यं.गो. अंदुरकर

28. लोकमान्य, 28 डिसेंबर, 1955.

29. दे. भ. तुळशीदास जाधव गौरव ग्रंथ, (111) – एम्.बी. साळुंखे.

30. महाराष्ट् विभाग कॉग्रेस कमिटी कार्याचा अहवाल . सायक्लोस्टाईल प्रत.

(ता. 27 डिसेंबर, 1957 ते 12 डिसेंबर, 1959 अखेर)